# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 16 October 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १६ ऑक्टोबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- गहू आणि हरबऱ्यासह सहा मुख्य रबी पिकांच्या किमान आधारभूत किमतीत वाढ करण्याला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी
- सत्ताधारी महायुतीकडून आपल्या कामकाजाचं प्रगती पुस्तक जाहीर–विकासाचे सर्व दावे खोटे असल्याची काँग्रेसची टीका
- आगामी विधानसभा निवडणुकीसाठी राज्यभरात निवडणूक यंत्रणा सज्ज

आणि

- प्रसिद्ध कवी डॉ. दासू वैद्य यांची राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या सदस्यपदी निवड

****

आगामी पणन हंगामासाठी सहा मुख्य रबी पिकांच्या किमान आधारभूत किमतीत वाढ करण्याला आज केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. मोहरीच्या दरात सर्वाधिक म्हणजे तीनशे रुपये प्रति क्विंटल इतकी वाढ करण्यात आली असून, मसूर दोनशे पंचाहत्तर रुपये प्रति क्विंटल, हरभरा दोनशे दहा, गहू दीडशे, करडई एकशे चाळीस तर जवाच्या दरात साठी एकशे तीस रुपये प्रति क्विंटलची वाढ करण्यात आली आहे. या वाढीनंतर गव्हाची किमान आधारभूत किंमत दोन हजार चारशे पंचवीस रुपये, जव – एक हजार नऊशे ऐंशी रुपये, हरभरा – पाच हजार सहाशे पन्नास रुपये, मसूर –सहा हजार सातशे रुपये, मोहरी–पाच हजार नऊशे पन्नास रुपये आणि करडई पाच हजार नऊशे चाळीस रुपये प्रति क्विंटल अशी झाली आहे.

केंद्रीय कर्मचारी आणि निवृत्तीवेतन धारकांच्या महागाई भत्त्यात तीन टक्के वाढ करण्यालाही केंद्रीय मंत्रिमंडळानं आज मान्यता दिली.

****

राज्यात काल विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर सत्ताधारी महायुतीनं सरकारच्या कामांचा आढावा घेणारं प्रगती पुस्तक आज प्रकाशित केलं. महाविकास आघाडीनं आपल्या कार्यकाळात अनेक प्रकल्पांमध्ये अडथळे आणले, पण, महायुतीचं सरकार आल्यानंतर विकासाला गती मिळाली, असं प्रतिपादन मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी यावेळी केलं.

उपमुख्यमंत्री तथा भाजप नेते देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख अजित पवार, केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले, आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी राज्य सरकारच्या दोन वर्षांचा कामांचा लेखाजोखा मुख्यमंत्र्यांनी मांडला.

****

दरम्यान, शिंदे यांनी केलेले विकासाचे सर्व दावे खोटे आणि बनावटी असल्याची टीका प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. २०१९ कोविड महामारीच्या काळात महाविकास आघाडी सरकारने केलेल्या कामाची दखल देशानेच नाही तर जगाने घेतल्याचं, पटोले यांनी सांगितलं.

****

मुंबईमधले अदानी समूहाला दिलेले भूखंड, राज्यात महाविकास आघाडीचं सरकार आल्यानंतर आम्ही परत घेऊ, असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आमदार आदित्य ठाकरे यांनी म्हटलं आहे, ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. या भूखंडांवरच्या बांधकामातून अदानी समूहाला कोट्यवधी रुपयांचा फायदा होऊ शकतो, मात्र महाविकास आघाडीचं सरकार सत्तेत आल्यास हे होऊ देणार नाही, असा दावाही आदित्य ठाकरे यांनी केला.

****

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगानं राज्याच्या प्रशासकीय यंत्रणाही सज्ज झाल्या असून पारदर्शक पद्धतीनं निवडणुका पार पडाव्यात यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर आयकर विभागही तयार असून निवडणुकीच्या कालावधीत काळ्या पैशांच्या संभाव्य व्यवहारावर नजर ठेवण्यात येणार आहे. रोख रकमेचं

वाटप, पैशाची देवाणघेवाण अशा बाबी दिसून आल्या तर नागरिकांनी १८००-२३३-०३५६ या नि:शुल्क क्रमांकावर आयकर विभागाशी संपर्क साधण्याचं आवाहन या विभागानं केलं आहे.

****

विधानसभा निवडणुकीत मतदानाचं प्रमाण वाढावं, यासाठी संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा विशेष प्रयत्न करत असून, या प्रयत्नांना यश मिळण्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी देखील आपापल्या स्तरावर सहकार्य करावं, तसंच आदर्श आचारसंहिता आणि निवडणूक प्रक्रिया अंमलबजावणीत प्रशासनाला सहकार्य करावं, असं आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी केलं आहे. मुंबई शहर जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्हा क्षेत्रातल्या राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमवेत आज मुंबईत झालेल्या बैठकीत ते बोलत होते. ज्या पात्र मतदारांनी अद्याप मतदार नोंदणी केलेली नाही त्यांना येत्या १९ ऑक्टोबरपर्यंत नाव नोंदणी किंवा नावात दुरुस्ती करता येईल, अशी माहिती गगराणी यांनी या बैठकीत दिली.

****

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी गडचिरोली जिल्हा प्रशासनानं पूर्ण तयारी केली आहे. जिल्हाधिकारी संजय दैने यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या जिल्ह्यात ३६२ मतदानकेंद्रं संवेदनशील आहेत. निवडणुकीसाठी केंद्रीय राखीव दल, राज्य राखीव दल आणि जिल्हा पोलिस अशा १७ हजार सुरक्षा रक्षकांची फौज तैनात करण्यात येणार आहे. दुर्गम भागातल्या दोनशे बारा मतदान केंद्रांवर ईव्हीएम आणि कर्मचाऱ्यांची ने-आण करण्यासाठी शासनाकडे पाच हेलिकॉप्टर्सची मागणी करण्यात आल्याची माहिती पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिली.

****

२०२४ च्या विधानसभा निवडणुका निर्भय आणि निष्पक्ष वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करा, असे निर्देश छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत. आज जिल्हाधिकारी कार्यालयात यासंदर्भात झालेल्या नियोजन बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला संबंधित सर्व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. जिल्ह्यातील सर्व नऊ विधानसभा मतदार संघात होणाऱ्या निवडणूक प्रक्रियेसाठी प्रशासन सज्ज असून, ३१ लाख ७६ हजार मतदार तीन हजार

२७३ मतदान केंद्रांवर मतदानाचा हक्क बजावणार असल्याची माहिती, स्वामी यांनी दिली. यासाठी १५ हजाराहून अधिक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली असून, शहर आणि ग्रामीण पोलिस, होमगार्ड, केंद्रीय आणि राज्य राखीव पोलिस दलाच्या आठ कंपन्या सज्ज असल्याचं जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितलं. यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत निवडणूक उपजिल्हाधिकारी देवेंद्र कटके यांनी प्रशासनाच्या तयारीचा आढावा दृक श्राव्य माध्यमातून सादर केला –

***आपल्या जिल्ह्यामध्ये एकूण मतदान केंद्रांची संख्या ही ३२७१ इतकी आहे. आपल्या जिल्ह्यामध्ये १६ प्रकारच्या विविध विषयांचे नोडल अधिकारी आपण नियुक्त केलेले आहेत. आपल्या सर्व ९ विधानसभा मतदारसंघांमध्ये मॉडेल मतदान केंद्र उभारणी करण्या संदर्भात कारवाई केली जाईल प्रत्येक विधानसभा मतदारसंघांमध्ये एक मॉडेल पोलिंग स्टेशन असेल १९५० हा टोल फ्री क्रमांक असेल जो कुठल्याही मतदाराला निवडणूकीच्या अनुसंघाने कुठली तक्रार करायची असेल किंवा माहिती मिळवायची असेल तर १९५० या क्रमांकावर डायल करून माहिती उपलब्ध करू शकता किंवा तक्रार नोंदवू शकता.***

महानगरपालिका हद्दीत असलेल्या विधानसभा मतदारसंघात आचारसंहिता अंमलबजावणी, मतदार जनजागृती, मतदारांना मतदान केंद्रावर द्यावयाच्या सुविधा याबाबत मनपा प्रशासन सक्रियतेनं काम करत असून यासंदर्भात निवडणूक आयोगानं दिलेल्या निर्देशांचे तंतोतंत पालन केलं जाईल, असं मनपा आयुक्त जी.श्रीकांत यांनी सांगितलं.

****

परभणी जिल्ह्यातल्या जिंतूर, परभणी, गंगाखेड आणि पाथरी या चारही मतदारसंघात मिळून एकूण १५ लाख ४४ हजार ४५१ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी अपर जिल्हाधिकारी डॉक्टर प्रताप चव्हाण आणि निवडणूक निर्णय अधिकारी जनार्धन विधाते  उपस्थित होते.

****

प्रसिद्ध कवि आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातले, मराठी भाषा विभाग प्रमुख डॉ. दासू वैद्य यांची राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या

सदस्यपदी निवड झाली आहे. आपल्या प्रदेशातल्या लेखकासंदर्भात किंवा उपक्रमासंदर्भात काही वेगळे प्रयत्न करण्याचा आपला प्रयत्न असेल, अशी भावना दासू वैद्य यांनी आकाशवाणीशी बोलतांना व्यक्त केली –

***मराठी साहित्य संस्कृतीत काम करण्याची संधी मला जी मिळाली आहे, सदानंद मोरे हे साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष आहेत, त्यांच्या मार्गदर्शनाखाली मला काम करायला मिळेल, याचा आनंद आहे. समाधान आहे. आपल्या प्रदेशातल्या लेखकासंदर्भात किंवा उपक्रमासंदर्भात काही वेगळे प्रयत्न यानिमित्तानं करता येतील का याचा मी प्रयत्न करेन.***

****

परशुराम आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते आशिष दामले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषदेच्या उपाध्यक्षपदी तुषार पवार आणि बापू भेगडे यांची निवड करण्यात आली आहे. या पदाधिकाऱ्यांचं राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार तसंच प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी अभिनंदन केलं आहे.

****

गंधार या बालनाट्य संस्थेचा यंदाचा गंधार गौरव पुरस्कार चित्रपट आणि मालिका सृष्टीतले ज्येष्ठ अभिनेते विजय गोखले यांना जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्कारांचं हे नववं वर्ष आहे. येत्या चौदा नोव्हेंबरला ठाण्यात हा पुरस्कार सोहळा होणार आहे.

****